**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४**

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ 2050
दिनांक: ३१/१०/२०१८

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त क.महाविद्यालये,(सातारा,सांगली,कोल्हापूर.)

विषय: **फेब्रु.-मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक (१२ वी) प्रमाणपत्र परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढीबाबत..**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, फेब्रु.-मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक (१२ वी) प्रमाणपत्र परीक्षेची नियमीत,पुनर्परिक्षार्थी,नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.maharashtra.gov.in किंवा www.mahahsscboard.in या संकेत स्थळावर नियमित शुल्कासह दि. २२/१०/२०१८ ते ०६/११/२०१८ या कालावधीत भरावयाची होती. परंतु SARAL Database ने माहीती भरताना काही कनिष्ठ महाविद्यालयांना अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब सदर आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढ देण्यात येत असून मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी.

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामार्फत शास्त्र कला व वाणीज्य शाखांची फक्त **नियमीत** विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत **व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी (Hsc Vocational Stream) ,पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नांवनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी,श्रेणीसुधार व तुरळक विषय घेवून** परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा |
|---|---|---|---|
| **नियमित शुल्क** | **सोमवार,दि.२२/१०/२०१८ ते मंगळवार दि. ०६/११/२०१८** | **बुधवार दि.३१/१०/२०१८ ते मंगळवार दि.०६/११/२०१८** | **सोमवार दि.१२/११/२०१८ ते शनिवार दि.१७/११/२०१८** |
| **विलंब शुल्कासह** | **बुधवार दि.०७/११/२०१८ ते शुक्रवार दि.३०/११/२०१८ ( सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत )** | | **सोमवार दि.०३/१२/२०१८ ते शुक्रवार दि.०७/१२/२०१८** |

- **महत्वाचे : नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावीत.**

* **दि.०१/११/२०१८ ते ३०/११/२०१८** या कालावधीत उच्च माध्यमिक शाळा/क.महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या याद्या Excel मध्ये प्रिंट कराव्यात.

* **दि. ०१/११/२०१८ ते ३०/११/२०१८** या कालावधीत प्रिलिस्ट प्रिंट करुन त्याची तपासणी करुन योग्य त्या दुरुस्त्या करण्यात याव्यात.

पुनर्परिक्षार्थी,यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी,श्रेणी सुधार व तुरळक विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची माहिती SARAL Data मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईन भरावयची आहेत.

**उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्काची रक्कम मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या सोमवार दिनांक १०.१२.२०१८ रोजी आपल्या जिल्हयाच्या निर्धारित वितरण केंद्रावर जमा करावयात.**

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर

- **वितरण केंद्रानी वरीलप्रमाणे जमा झालेले साहित्य विहीत नमुन्यात तालुकानिहाय नोंद करुन बुधवार दिनांक १२.१२.२०१८ रोजी कोणत्याही परिस्थितीत कोल्हापूर विभागीय कार्यालयाकडे जमा करावयाच्या आहेत**

Rao general